"संगीत संत तुकाराम" या नाटकाच्या अनुदानासाठीच्या प्रयोग सादरीकरणास तीन महिने मुदतवाढ देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. नासंअ ४८१९/प्र.क्र.१९७/सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १ ऑगस्ट, २०१९**

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. नानिअ २०१२/ प्र. क्र. २५०/सां.का.४, दिनांक १९ जानेवारी, २०१६
२) सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे पत्र क्र. सां.का.सं/२१६८, दिनांक १९ मे, २०१८
३) सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे पत्र क्र. सां.का.सं/२०७७, दिनांक ०४ जून, २०१९

**<u>प्रस्तावना :-</u>**

उपर्निर्दिष्ट क्र. १ येथील दिनांक १९ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये "नाटयनिर्मिती संस्थांना नाट्यप्रयोगासाठी अनुदान मंजूर करणे" या योजनेची सुधारीत नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उपर्निर्दिष्ट क्र. २ येथील दिनांक १९ मे, २०१८ च्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या पत्रान्वये "संगीत संत तुकाराम" या नाटकास "ब" दर्जा देण्यात आला आहे. नियमावलीनुसार अनुदानास पात्र झालेल्या नाटकांना पत्राच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत नाट्यनिर्मिती अनुदान योजनेच्या अटी व शर्तीनुसार ७५ प्रयोग सादर करणे आवश्यक असतात. तथापि, "संगीत संत तुकाराम" नाटकात भूमिका करणारे कलाकार निवडणूक कर्तव्यार्थ असल्यामुळे त्यांना "संगीत संत तुकाराम" नाटकाचे प्रयोग करणे शक्य झाले नाही. त्यामुळे कलाकाराची निवडणूक कर्तव्यार्थ जबाबदारी लक्षात घेता, सदर संस्थेस "संगीत संत तुकाराम" या नाटकासाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

ॐ नाट्यगंधा, मुंबई या संस्थेच्या "संगीत संत तुकाराम" या नाटकास "नाटयनिर्मिती संस्थांना नाट्यप्रयोगासाठी अनुदान मंजूर करणे" या योजनेखाली अनुदान मिळण्याकरिता ७५ प्रयोग सादर करण्यासाठी दिनांक १९ मे, २०१९ पासून पुढील ३ महिन्याची मुदतवाढ **"विशेष बाब"** म्हणून देण्यात येत आहे.

२. सदर प्रकरण पूर्व उदाहरण म्हणून घेण्यात येऊ नये.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८०२१५५७०८४४२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Vilas Ramrao Thorat

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae1145 7103a0cfb9a57fc6ce6, serialNumber=cb03c92b399cc89310bf1378c184d97a4b7b9b98e 926ea8e71dd7bc9cb273631, cn=Vilas Ramrao Thorat
Date: 2019.08.02 16:09:55 +05'30'

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. संचालक, ॐ नाटयगंधा, सीता स्मृती, तिसरा मजला, राजाराम केशव मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८ (संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचेमार्फत)
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२.अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१३.निवड नस्ती, सां.का.४